**दारव्हा:** तालुक्यातील मानकोपरा येथे अण्णाभाऊ साठे जयंती १ ऑगस्टला सकाळी ९.०० वाजता साजरी करण्यात आली. यावेळी पंचायत समिती सदस्य संतोष ठाकरे यांच्याहस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या फलकाला हारार्पण करण्यात आले. यावेळी पं.स.सदस्य संतोष ठाकरे यांनी अण्णाभाऊचे विचार तरूणांनी अंगिकारल्यास जिवनात आमुलाग्र बदल घडेल असे विचार व्यक्त केले. यावेळी शंकर वायले, वसंत नागोलकर, घोडे साहेब, उकंडराव राठोड, अश्विन काटकर, रमेश सावळे, भाऊराव गायकवाड आदी समाज बांधव उपस्थित होते.

Thu, 02 August 2018
deshonnati.digitaledition.in/c/30824227

*Annabhau Shathe Birth & L. Tilak Death Anniversary News published by Deshonnati Newspaper*

## 1 to 15 August 2018 Swachata Pandrwada (Cleanliness fortnight)



*NSS Volunteers  cleaning campus*




*NSS Volunteers Participated Cleanliness Rally*



*NSS Volunteers cleaning 'Sub District Health Centre Darwha'*



*NSS Volunteers cleaning 'Bus Stand Darwha'*



*NSS Volunteers cleaning 'Railway Station Darwha'*



*NSS Volunteers Cleaning Backward Area of Darwha*



*Inauguration of Poster Presentation Competition*



*Dr. S.V. Chatur delivered speech on 'Revolution Day'*



*NSS Volunteers participated in 'Group Discussion'*




*Seminar presentation by NSS Volunteers*



*Students taking 'Cleanliness Pledge'*



## मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे स्वच्छता पंधरवाडा

Fri, 17 August 2018
deshonnati.digitaleditio



सकाळ

## मुंगसाजी महाविद्यालय स्वच्छता पंधरवडा

Nagpur, Yavatmal Today
21/08/2018 Page No. 3

*Cleanliness Pandharwada (Cleanliness fortnight) news published by Deshonnati newspaper*

## 20/8/2018 Goodwill Day & Shetipurk Vyavsay Prshikshan Workshop (Agribusiness training workshop)



*Dr. Nandkishor Hirve delivered speech on Goodwill Day & Shetipurk Vyavsay Prashiksham Workshop* **(Agribusiness training workshop)**



सकाळ

# शेतीक्षेत्रात अनेक संधी उपलब्ध

## डॉ. नंदकिशोर हिरवे : शेतीपूरक व्यवसाय प्रशिक्षण कार्यशाळा

दारव्हा ता. २५ : शेती व्यवसाय हा उच्च शिक्षितांनी करावयाचा व्यवसाय आहे. शेतीच्या क्षेत्रात अनेक संधी असून उच्चशिक्षित विद्यार्थ्यांनी यामध्ये आपले करिअर करीत रोजगार निर्मिती करावी, असे मत विज्ञान केंद्राचे डॉ. नंदकिशोर हिरवे यांनी व्यक्त केले.

स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सद्भावना दिनानिमित्त आयोजित 'शेतीविषयक व्यवसायाचे प्रशिक्षण' या विषयावर मार्गदर्शन कार्यशाळेत डॉ. हिरवे मार्गदर्शक म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास राऊत तर प्रमुख पाहुणे म्हणून वासुदेव चांदुरकर, नम्रता राजस, डॉ. संतोष चतुर उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ. हिरवे म्हणाले की, शेतीतून चांगल्या गोष्टींची निर्मिती करता येते. कुक्कुटपालन, बकरीपालन, मत्स्यपालन, शेळीपालन, मधुमक्षिकापालन, गांडूळखत निर्मिती असे अनेक पूरक व्यवसाय शेती सोबत करता येतात. त्यामुळे या क्षेत्रात उच्चशिक्षित विद्यार्थ्यांनी करिअर करीत रोजगार निर्मिती करावी असे आवाहन यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी वासुदेव चांदुरकर, नम्रता राजस, डॉ. संतोष चतुर यांनीही विचार मांडले. प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत, संचालन प्रा. प्रियांका रुईकर तर आभार मनीष मोहोड यांनी मानले.

दारव्हा : शेतीविषयक व्यवसायाचे प्रशिक्षण कार्यशाळेला उपस्थित मान्यवर.

### विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगाराकडे वाटचाल करावी

कृषी विज्ञान केंद्राद्वारे उपलब्ध होणाऱ्या प्रशिक्षणवर्गांचे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लाभ घेत स्वयंरोजगाराकडे वाटचाल करावी असे मत प्राचार्य डॉ.. विलास राऊत यांनी व्यक्त केले.

Nagpur, Yavatmal-Today
26/08/2018 Page No. 4

*Good Will Day & Shetipurk Vyavsay Prashiksham Workshop* **(Agribusiness training workshop)**
*news published by Sakal newspaper*

## 30/8/2018 Keral Flood Donation Rally



*Keral Flood Donation Rally*



सकाळ

# केरळ येथील पूरग्रस्तांसाठी दारव्हा शहरात मदतफेरी

## मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा पुढाकार

**सकाळ वृत्तसेवा**

दारव्हा, ता. ३१ : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व दारव्हा, येथील विविध सामाजिक संघटनांद्वारे केरळमधील पूर पीडितांसाठी गुरुवारी (ता. ३०) मदत रॅली काढण्यात आली.

याप्रसंगी रॅलीच्या सुरुवातीला डॉ. अजय दुबे, ठाकूर, पांडे, राजेश जाधव आदी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त करून केरळ पूर पीडितांसाठी मदत करण्याचे आवाहन दारव्हावासींना केले. त्यानंतर रॅली बचत भवन येथून रॅली पोष्ट ऑफीस, शिवाजी चौक, मेन लाईन, अंबादेवी मंदिर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, गोळीबार चौक, बसस्टॅन्ड, दिग्रसचौक आदी प्रमुख मार्गाने रॅली जाऊन पूर पीडितांसाठी आर्थिक मदत मागण्यात आली. रॅलीचा समारोप दिग्रस चौकात करण्यात आला. मदतीची रक्कम ६९ हजार ५८७ नायब तहसीलदार दारव्हा यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

रॅलीच्या यशस्वितेसाठी विविध सामाजिक व मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्ह्याचे प्राचार्य डॉ. विलास राऊत, डॉ. संगिता घुईखेडकर, रासेयोचे स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, डॉ. मनिष मोहरील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रियंका रुईकर, सुषमा गावंडे, डॉ. संतोष चतूर, डॉ. सुभाष जाधव, डॉ. अरविंद लाडोळे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी व प्राध्यापक, आदींनी पुढाकार घेतला.

Nagpur, Yavatmal-Today
01/09/2018 Page No. 3

*Keral Flood Donation Rally new published by Sakal Newspaper*

लोकमत




# मुंगसाजी महाविद्यालय, दारव्हा

दारव्हा - येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी केरळ पूरपीडितांसाठी काढलेल्या मदत रॅलीत सहभाग घेतला. येथील बचत भवनापासून रॅलीला सुरुवात झाली. शहरातील प्रमुख मार्गाने फिरून विद्यार्थ्यांनी मदतनिधी गोळा केला. या रॅलीसाठी संस्था सचिव डॉ. संगीता घुईखेडकर, प्राचार्य डॉ. विलास राऊत, उपप्राचार्य डॉ. अजय दुबे, डॉ. शंकर सावंत, डॉ. मनिष मोहरील, प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. सुषमा गावंडे, डॉ. संतोष चतर, डॉ. सभाष जाधव, डॉ. अरविंद लाजोळे आदींनी परिश्रम घेतले.


Hello Yavatmal
Page No. 3 Sep 03, 2018
Powered by: erelego.com


*Keral Flood Donation Rally new published by Lokmat Newspaper*

# 5/9/2018 Teachers Day



*Ku. P. B. Ruikar delivered speech on 'Teachers Day'*



सकाळ

## मुंगसाजी महाराज महाविद्यालयात शिक्षकदिन

दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे राष्ट्रीय सेवा योजना व स्वयंशासन समितीद्वारा शिक्षकदिनानिमित्त स्वयंशासन व शिक्षकदिन कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास राऊत तर प्रमुख उपस्थितांमध्ये कला शाखाप्रमुख डॉ. सुनील चकवे, डॉ. संतोष चतुर, डॉ. शंकर सावंत, प्रा. सुनील डंभारे, प्रा. खुशाल ढवळे, डॉ. मनीष मोहरील, प्रा. प्रियंका रुईकर आदी प्राध्यापकवर्ग उपस्थित होता. यावप्रसंगी शिक्षक म्हणून विद्यार्थ्यांनी भूमिका पार पाडताना रोजचे नियमित तास विद्यार्थ्यांनी स्वत: शिकविले. यशस्वितेसाठी विकास पाईकराव, मंगेश धुरंधर, विक्रम गिरी, अभिजित लडबडे, राधिका कोळपे, कल्याण गेडाम, आरती लोखंडे आदींनी पुढाकार घेतला.

Nagpur, Yavatmal-Today
11/09/2018 Page No. 5



## मुंगसाजी महाराज महाविद्यालयात, दारव्हा

***शहर प्रतिनीधी/*** ८ सप्टेंबर

**दारव्हा :** स्थानीक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी स्वयंशासन समिती तयार करुन महाविद्यालयाचा एक दिवशीय कारभार विद्यार्थ्यांनी सांभाळला. त्यानंतर स्वयंशासन समिती व रासेयो यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक दिनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास राऊत उपस्थित होते. तर प्रमुख अतिथीमध्ये डॉ. सुनिल चवक्ये, डॉ. संतोष चतुर, डॉ. शंकर सावंत, प्रा. सुनिल डंभारे, डॉ. मनीष मोहरील, प्रा. कु. प्रियंका रुईकर आदी प्राध्यापकांची उपस्थिती होती. यावेळी अध्यक्षांनी व प्रमुख अतिथींनी शिक्षकदिनाचे महत्त्व विषद करुन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रकाश इंगळे याने तर आभार प्रा. प्रियंका रुईकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विकास पाईकराव, मंगेश धुरंधर, विक्रम गिरी, अभिजीत लडबडे, कु. राधीका कोळापे, कु. कल्याणी गेडाम, कु. आरती लोखंडे आदींनी परिश्रम घेतले.

ePaper देशोन्नती Sun, 09 Sept deshonnati.d

*'Teachers Day' new published by Deshonnati & Sakal Newspaper*

## 18/9/2018 Employment Based 'Skill Development Workshop'



*Mr. Sagar Dharmadhikari delivered speech on Employment Based 'Skill Development Workshop'*



# मु.म. महाविद्यालयात रोजगारभिमुख कौशल्य विकास कार्यशाळा

*शहर प्रतिनिधी* / १८ सप्टेंबर

दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे रासेयो व सांस्कृतिक विभागाद्वारा रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते सागर धर्माधिकारी, नाशिक तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास राऊत, प्रमुख उपस्थितीमध्ये कला शाखाप्रमुख डॉ. सुनिल वकवे, डॉ. प्रशांत बागेश्वर, डॉ. सुभाष जाधव, डॉ. संतोष चतुर, डॉ. शंकर सावंत, प्रा. संदिप भुरले, प्रा. रवि बोरकर, प्रा. कु. प्रियंका खईकर, प्रा. कु. अख्तरउन्नीसा कुरेशी आदि प्राध्यापक उपस्थित होते. प्रमुख वक्ते सागर धर्माधिकारी यांनी कौशल्य भारत योजनेची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच या सर्व कौशल्य विकास प्रशिक्षण भावूढील कालावधीत आपल्याच महाविद्यालयात उपलब्ध होणार असून ते प्रशिक्षण विद्यार्थ्यांनी कशाप्रकारे घ्यावे याचे सुध्दा मार्गदर्शन केले. त्यानंतर अध्यक्षिय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी विद्यार्थ्यांनी कौशल्य विकास प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेवून स्वताचा रोजगार निर्माण करावा असे आवाहन केले. संचालन रासेयो स्वयंसेवक मंगेश धुरंधर तर प्रास्ताविक डॉ. प्रशांत बागेश्वर व आभार प्रदर्शन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी केले. यशस्वितेसाठी विकास पाईकराव, मंगेश धुरंधर, विक्रम गिरी, अभिजीत लडबडे, कु. राधिका कोळपे, कु. कल्याणी गेडाम, कु. आरती लोखंडे आदिंनी परिश्रम घेतले.

Wed, 19 September 2018
deshonnati.digitaledition.in/c/32330870

*News of Employment Based 'Skill Development Workshop' published by Deshonnati newspaper*



# रोगगाराभिमुख कौशल्य विकास कार्यशाळा

दारव्हा, दि.२८ (तालुका प्रतिनिधी)

दिनांक १८ सप्टेंबर २०१८ रोजी मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतीक विभागाद्वारा रोजगाराभिमुख कौशल्य विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते सागर धर्माधिकारी, नाशिक हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे

प्राचार्य डॉ. विलास राऊत तर प्रमुख उपस्थितीमध्ये कला शाखाप्रमुख डॉ. सुनिल चक्रवे, डॉ. प्रशांत बागेश्वर, डॉ. सुभाष जाधव, डॉ. संतोष चतुर, डॉ. शंकर सावंत, प्रा. संदिप भुरले, प्रा. रवि बोलकर, प्रा.कु. प्रियंका सर्फेकर, प्रा. कु. अफ्सानाअंजीला कुरेशी आदि प्राध्यापक वर्ग उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते सागर धर्माधिकारी यांनी कौशल्य भारत योजनेची माहिती विद्यार्थ्यांनी दिली. तसेच कौशल्य भारत योजनेच्या माध्यमातुन चालणाऱ्या ब्युटीपार्लर, बिजनेस अँन्ड मॅनेजमेंट, टुरिझम, आय.बी.बी.एस. बँकिंग आदिच्या संदर्भातिल कौशल्य विद्यार्थ्यांनी कसे अवगत करावे याचे सविस्तर ज्ञान त्यांनी आपल्या विचारातुन विद्यार्थ्यांनी कौशल्य विकास प्रशिक्षण शिबिराचा लाभ घेऊन स्वतःचा रोजगार निर्माण करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी केले तसेच कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता विकास पाईकराव, मंगेश धुंधर, विक्रम गिरी, अभिजीत लडखडे, कु. राधिका कोळापे, कु. कल्याणी गेडाम, कु. आरती लोखंडे आदिंनी अथक परिश्रम घेतले.

*News of Employment Based 'Skill Development Workshop' published by Deshonnati newspaper*

## 15 September To 2 October 2018 Swachata HichSewaPandrwada



*NSS Volunteers cleaning the campus*



*NSS Volunteers cleaning Bus Stand Darwha*



*NSS Volunteers in Leprosy Survey Training*



*NSS Volunteers Cleaning 'Sub District Health Centre', Darwha*

## ‘Save Water Save Tree Programme’



*‘Save Water Save Tree’ speech delivered by Dr. V. P. Khodskar*



### मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

दारव्हा - येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात नेर येथील नेहरु महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे 'सेव्ह वॉटर-सेव्ह ट्री' कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी डॉ.सुनील चकवे होते. डॉ.विष्णू कुटे, डॉ.व्ही.ए.खोडस्कर, डॉ.पी.एच.चव्हाण यांनी मार्गदर्शन केले. संचालन मंगेश धुरंधर, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत यांनी तर आभार प्रा.प्रियंका रुईकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी डॉ.संतोष चतुर, प्रा.संदीप भुरले, प्रा.नितीन भिंगारे, प्रा.रवी बोरकर, प्रा.अख्तरउन्निसा कुरेशी यांनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Nov 06, 2018
Powered by: erelego.com

*‘Save Water Save Tree’ news published by Lokmat Newspaper*



### मु.म. महाविद्यालयात सेव्ह वॉटर सेव्ह ट्री कार्यक्रम

*शहर प्रतिनिधी* / २४ सप्टेंबर

दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे रासेयो विभागाद्वारे व नेहरू महाविद्यालय नेर यांचे संयुक्त विद्यमाने सेव्ह वॉटर सेव्ह ट्री कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चकवे, प्रमुख वक्ते म्हणून विष्णू कुटे, डॉ. व्ही. ए. खोडस्कर, डॉ.पी. एच. चव्हाण, नेहरू महाविद्यालय, नेर आदि उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. विष्णू कुटे यांनी जंगल व पाणी मानवी जीवनातील महत्व या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. पी.एच. चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना आव्हान केले की, जल व जंगल संवर्धन व संरक्षण करीता त्यांनी दाणा किंवा खारीचा वाटा उचलावा असे प्रत्येकाने केल्यास जल व जंगलाचे संरक्षण व संवर्धन होईल व आपले जीवन सुखी समाधानी होईल. डॉ. व्ही.पी. खोडस्कर यांनी प्रेझेंटेशनव्दारे जल व जंगलाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले.

अध्यक्षीय भाषणामध्ये कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चकवे यांनी जल व जंगलाचे संवर्धन व संरक्षण करणे ही आज काळाची गरज आहे असे विचार व्यक्त केले. मान्यवरांनी मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील प्राध्यापक मंडळींनी रोपटे भेट देवून त्यांचे रोपन करून संवर्धन व संरक्षण करावे अशी विनंती केली. संचालन मंगेश धुरंधर, प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत तर आभार प्रदर्शन रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. प्रियंका रुईकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीत करीता महाविद्यालयातील डॉ. सुनिल चकवे, डॉ. संतोष चतुर, प्रा. संदिप भुरले, प्रा. नितीन भिंगारे, प्रा. रवि बोरकर, प्रा. कु. प्रियंका रुईकर, प्रा. कु. अख्तरउन्नीसा कुरेशी आदि प्राध्यापक वर्ग व महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

Tue, 25 September 2018
deshonnati.digitaledition.in/c/32528280

*‘Save Water Save Tree’ news published by Lokmat & Deshonnati newspapers*

# NSS Day




*'NSS Day' speech delivered by Dr. Vijay Gawande*



## रासेयो दिनानिमित्त स्वच्छता जनजागृती व्याख्यान

***शहर प्रतिनिधी* / २८ सप्टेंबर**

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाव्दारे रासेयो दिनानिमित्त स्वच्छता जनजागृती व्याख्यान व उद्बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चकवे तर प्रमुख वक्ते म्हणुन प्राचार्य विजय गावंडे, इश्वर देशमुख महाविद्यालय दिग्रस व डॉ. संतोष चतुर तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्रा.संदिप भुरले उपस्थित होते.

याप्रसंगी प्रमुख वक्ते विजय गावंडे यांनी रासेयो निर्मितीचा इतिहास व रासेयोच्या माध्यमातुन केले जाणारे कार्य विद्यार्थ्यांना सांगितले. डॉ. संतोष चतुर यांनी रासेयो म्हणजे समाज सेवा करण्याचा ध्यास व स्वताचे व्यक्तीमत्व घडविण्याचा ध्यास असल्याचे सांगितले. डॉ. सुनिल चकवे यांनी रासेयोचे व्यासपीठ हे विकासाचे असुन, त्याचा वापर विद्यार्थ्यांनी स्वतःच्या विकासासाठी करावा असे आवाहन केले. प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी केले तर संचालन मंगेश धुरंधर व आभार प्रदर्शन प्रियंका रुईकर यांनी केले. यशस्वीतेसाठी डॉ. मनिष मोहरील, प्रा. कु. अख्तरउन्नीसा कुरेशी यांनी परिश्रम घेतले.

Sat, 29 September 2018
deshonnati.digitaledition.in/c/32644446

*'NSS Day' news published by Deshonnati newspaper*

सकाळ



दारव्हा : राष्ट्रीय सेवा योजनादिनानिमित्त स्वच्छता करताना विद्यार्थी.

## 'रासेयो'दिनानिमित्त स्वच्छता मोहीम

**दारव्हा :** येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनादिनानिमित्त स्वच्छता जनजागृती व व्याख्यान नुकतेच झाले. अध्यक्षस्थानी कला शाखाप्रमुख डॉ. सुनील चकवे ओटे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य विजय गावंडे, डॉ. संतोष चतुर, प्रा. संदीप भुरले उपस्थित होते. विजय गावंडे यांनी राष्ट्रीय सेवा योजना निर्मितीचा इतिहास व या माध्यमातून केली जाणाऱ्या कार्यांची माहिती दिली. प्रा. चतुर, डॉ. सुनील चकवे यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंगेश धुरंधर यांनी केले. प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी केले. प्रा. प्रियांका रुईकर यांनी आभार मानले.

Nagpur, Yavatmal-Today
05/10/2018 Page No. 3

*NSS Day news published by Sakal newspaper*

## Waste From Best



*'Waste From Best' Demonstration by Namrta Rajas*



२८/०९/२०१८ यवतमाळ शहर विशेष शिहझेप

पान २

## टाकाऊ वस्तु पासून टिकाऊ वस्तू बनविल्याने प्रदुषण दुर होते – नम्रता राजस

*Waste From Best news published by Shihzep newspaper*

## One Day



*NSS volunteer cleaning adopted village in 'One Day Camp'*



*NSS volunteer cleaning adopted village in 'One Day Camp'*



*Cleaning Awareness by NSS volunteer in adopted Village in 'One Day Camp'*



*Cleaning Awareness by NSS volunteer in adopted Village in 'One Day Camp'*



*‘Cleaning Awareness Rally’ by NSS volunteer in adopted village in ‘One Day Camp’*



# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात एकदिवशीय शिबीर

दारव्हा - ता. प्र.

दि. २८ सप्टेंबर रोजी मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे दत्तक ग्राम [illegible] येथे एकदिवशीय शिबीराचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी दत्तक ग्रामात रासेयो स्वयंसेवकाद्वारे ग्राम पंचायत, जि. प. शाळा, महालक्ष्मी मंदिर व गावातील मुख्य परिसरात परिसर स्वच्छता राबवण्यात आली. यामध्ये परिसरातील गवत, केर कचरा, पॉलीथीनच्या पिशव्या जमा करून नष्ट करण्यात आल्या. जि. प. शाळेचा परिसर स्वच्छ केल्यानंतर जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांना रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या आई, वडिलांकडे शौचालय बांधण्याचा हट्ट करावा तसेच आपल्या - आपल्या घराच्या सभोवतालची स्वच्छता आपल्या घरातील आपल्या पेक्षा मोठ्या असणाऱ्या वडीलधाऱ्या मंडळींनी करावी याचा सुद्धा आग्रह धरावा व आपली व्यक्तिगत स्वच्छता ठेवावी असे सांगितले. त्यानंतर गावातून स्वच्छता रॅली काढून गावात स्वच्छतेचा संदेश दिला यामध्ये करून आपण असे काम उंचावे, गावाचा शान. आरोग्य म्हणजे रोजगार सर्व नाही तर कायमचे आजारपण, स्वच्छता असे जेथे आरोग्य वसे तेथे स्वच्छता तेथे भरपूर डॉक्टर राहील दूरदूर, ज्यांच्या घरी शौचालय नाही त्यांच्या घरी मुलगी देणार नाही व त्यांच्या घरची मुलगी करणार नाही आदि घोष वाक्याद्वारे स्वच्छता संदेश दिला. त्यानंतर गावाच्या प्रमुख चौकात रासेयो स्वयंसेवकांनी पथनाट्य सादर करून पथनाट्याच्या माध्यमातून गावकऱ्यांना स्वच्छतेचा संदेश दिला. नंतर रासेयो स्वयंसेवकांनी समूहा समूहाने घरोघरी जाऊन दत्तक ग्रामातील लोकांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करून दत्तक ग्रामात बस स्टॉप ते महालक्ष्मी मंदिर या रस्त्यावर व रस्त्या लगत असणाऱ्या पॉलीथीनच्या पिशव्या जमा करून त्या पेटवून देऊन नष्ट केल्या. त्यानंतर मागील वर्षी रासेयो स्वयंसेवकांद्वारे राबवलेल्या विशेष प्रकल्पाला भेट देऊन प्रकल्पाची पाहणी केली व त्या प्रकल्पाचे गावकऱ्यांना झालेले फायदे स्पष्ट करून हे सर्व रासेयो स्वयंसेवकांच्या श्रमदानातून झाले. त्यामुळे रासेयोचे स्वयंसेवकांचे श्रमदान कसे विधायक स्वरूपाचे आहे हे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी स्पष्ट केले. शेवटी सहभोजन करून रासेयो स्वयंसेवकांनी महाविद्यालयाकडे प्रस्थान केले. हे एकदिवशीय शिबीर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत यांचे मार्गदर्शनात कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. [illegible], महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. [illegible] यांनी केले.

*News published by Shihzep Newspaper of ‘One Day Camp’*



# स्वच्छता हीसेवा अंतर्गत विविध कार्यक्रम

Sat, 27 October 2018
deshonnati.digitaledition.in/c/33449926

*News published by Deshonnati Newspaper of 'One Day Camp'*

## Gandhiji`s Birth Anniversary




*Gandhiji`s Birth Anniversary delivered speech by Mrs. Shusma Gawande*

# 13/10/2018 Redding Inspiration Day



*'Books Exhibition' on 'Reading Inspiration Day'*



## मुंगसाजी महाराज महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन व ग्रंथ प्रदर्शनी

**शहर प्रतिनिधी** / १६ ऑक्टोबर

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथे ग्रंथालय व रासेयो विभाग यांचे संयुक्त विद्यमाने १५ ऑक्टोबर ला डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आझाद यांचे जयंती दिनानिमित्त वाचन प्रेरणा दिन व ग्रंथ प्रदर्शनी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विलास राऊत तर प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर, उपप्राचार्य डॉ. अजय दुबे, कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चक्रे, डॉ. अरविंद लाहोळे, डॉ. संतोष चतुर, प्रा. नितीन भिंगारे, प्रा. संदीप मुरले, आदी उपस्थित होते.

याप्रसंगी प्राचार्य डॉ. विलास राऊत व सचिव डॉ. संगीता घुईखेडकर यांनी फीत कापून ग्रंथ प्रदर्शनीचे उद्घाटन केले. याप्रसंगी प्रमुख वक्ते डॉ. संगीताताई घुईखेडकर यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम आझाद यांनी देशाकरीता केलेल्या महान कार्याचे वर्णन केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी वाचन ही आज काळाची गरज असून विद्यार्थ्यांनी वाचनावर भर द्यावा. ग्रंथालयातील उपलब्ध पुस्तकांचा उपयोग आपले भविष्य घडविण्यासाठी करावा असे आवाहन करून वाचनद्वारे डॉ. कलामांना अभिवादन करावे असे म्हटले. यशस्वीतेसाठी ग्रंथपाल प्रा. अमोल वाकोडे, ग्रंथालय कर्मचारी मनीष लांजेवार, विनोद ईंगोले, गजानन ईरवे, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका शईकर, अख्तरुन्नीसा कुरेशी आदींनी अथक परिश्रम घेतले.

Wed, 17 October 2018
deshonnati.digitaledition.in/c/33192488

*News published by 'Deshonnati' Newspaper of 'Reading Inspiration Day'*



दारव्हा : वाचन प्रेरणादिनानिमित्त ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करताना डॉ. विलास राऊत व इतर मान्यवर.

## मुंगसाजी महाराज महाविद्यालयात वाचन प्रेरणादिनानिमित्त ग्रंथप्रदर्शन

दारव्हा : माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयात ग्रंथालय व राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे सोमवारी (ता. १५) वाचन प्रेरणादिन व ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर, उपप्राचार्य डॉ. अजय दुबे, कला शाखाप्रमुख डॉ. सुनील चकवे, डॉ. अरविंद लाडोळे, डॉ. संतोष चतुर, प्रा. नितीन भिंगारे, प्रा. संदीप भुरले आदी उपस्थित होते. प्राचार्य राऊत व डॉ. घुईखेडकर यांनी फीत कापून ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन केले. प्राचार्य राऊत यांनी 'वाचन ही काळाची गरज असून, विद्यार्थ्यांनी वाचनावर भर द्यावा व ग्रंथालयातील उपलब्ध पुस्तकांचा उपयोग आपले भविष्य घडविण्यासाठी करावा', असे म्हणाले. या कार्यक्रमासाठी ग्रंथपाल प्रा. अमोल वाकोडे, ग्रंथालय कर्मचारी मनीष लांजेवार, विनोद इंगोले, गजानन इरवे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रुईकर, अख्तरुन्नीसा कुरेशी आदींनी पुढाकार घेतला.

***News published by 'Sakal' Newspaper of 'Reading Inspiration Day'***

# सिंहझेप

संस्थापक संपादक - स्व. देविदास भोरे संपादक - मनोज मोहनलालजी जयस्वाल

RNI NO.18800/69 | किंमत दोन रुपये | पृष्ठ ४ | अंक क्रं. २२७ | E-Mail-dail

## मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा वाचन प्रेरणा दिन व ग्रंथ प्रदर्शनी संपन्न



***News published by 'Sinhazep' Newspaper of 'Reading Inspiration Day'***

‘

## 26/11/2018 ‘Constitution Day’



*Dr. Vilas B. Raut, Principal Worshiping Dr. Ambedkar Image*

## 30/11/2018 ‘National Integration Day’



*Mr. Khushal Dhawale delivered speech on ‘National Integration Day’*



*NSS Volunteer took Pledge regarding ‘National Integration Day’*

# 6/12/2018 'Mahaprinirvan Day'



*Dr. Sunil Chawake delivered speech on 'Mahaprinirvan Day'*

लोकमत



## मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

दारव्हा - येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्यावतीने महापरिनिर्वाण दिनाचे आयोजन केले होते. यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यात आली. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.अजय दुबे होते. डॉ.सुनील चवक्ये, डॉ.संतोष चतुर, प्रा.खुशाल ढवळे उपस्थित होते. यावेळी डॉ.दुबे, प्रा.ढवळे यांनी मार्गदर्शन करताना डॉ.आंबेडकर यांच्या कार्याचा गौरव केला. कार्यक्रमाला प्रा.प्रियंका रुईकर, प्रा.अख्तरउन्निसा कुरेशी उपस्थित होत्या. संचालन विकास पाईकराव, प्रास्ताविक डॉ.शंकर सावंत, तर आभार प्रा.संदीप भुरले यांनी मानले

Hello Yavatmal
Page No. 3 Dec 11, 2018
Powered by: erelego.com

*News published by 'Lokmat Paper' of ' Mahaprinirvan Day'*

## मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

**दारव्हा** : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतीक विभागाद्वारे महापरिनिर्वाण दिनाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अजय दुबे तर प्रमुख उपस्थितीमध्ये कला शाखा प्रमुख डॉ. सुनिल चवक्रे, डॉ. संतोष चतुर आदी उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला हार अर्पण करुन दीप प्रज्वलित केला. याप्रसंगी प्रमुख वक्ते यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचा उल्लेख करताना सांगितले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे स्वाभिमानाने जीवन जगले. अनेक श्रेष्ठ पद प्राप्त होत असून सुध्दा कोणतेही पद घेतले नाही. तसेच त्यांनी कोणत्याही एका समाजासाठी कार्य केले नाही तर देशातील शोषित, पीडित व दलितासाठी कार्य केले. देशातील शोषित, पीडित व पददलिताच्या उद्धारासाठी घटना तयार करण्याचे काम केले. तशीच देशाला अखंड कसे ठेवता येईल यासाठी प्रयत्न केले, असे मत व्यक्त केले. संचालन विकास पाईकराव तर प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी आणि आभार प्रा.संदीप भुरले यांनी केले. कार्यक्रमास प्रा. कु. प्रियंका रुईकर, प्रा. अख्तरुन्निस कुरेशी व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थितीत होते.

ePaper देशोन्नती Sat, 08 December deshonnati.digita

*News published by 'Deshonnati' paper of ' Mahaprinirvan Day'*

# 14/12/2018 ‘AIDS Awareness Rally’



*AIDS Awareness Rally*



लोकमत

दारव्हा येथे जनजागृती रॅलीत सहभागी विद्यार्थी व उपजिल्हा रुग्णालयाचे कर्मचारी.

## दारव्ह्यात आरोग्य विभागाची जनजागृती रॅली

लोकमत न्यूज नेटवर्क

**दारव्हा :** येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालय व उपजिल्हा रुग्णालयातर्फे जागतिक एड्स सप्ताहानिमित्त एड्स जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीला उपजिल्हा रुग्णालयात डॉ.विलास नवरंगे यांनी हिरवी झेंडी दाखविली. रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांनी घोषणा देऊन एड्स आजाराबाबत जनजागृती केली. रॅलीचा समारोप शिवाजी स्टेडियमवर झाला. यावेळी एड्स समुपदेशक प्रवीण नगराळे यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी गैरसमजुती दूर करण्याचा प्रयत्न केला. वैद्यकीय अधीक्षक डॉ.आशिष कदम यांनी एड्स हा आजार न होण्यासाठी काय काळजी घ्यावी व आपली वर्तणूक स्वच्छ ठेवावी, असे आवाहन केले.

स्वयंसेवी संस्थेचे सदस्य अनिल त्रिवेदी यांनी सहभागी महाविद्यालयांचे आभार मानले. रॅलीमध्ये मुंगसाजी महाराज महाविद्यालय, जिजामाता महाविद्यालय, आयटीआय, मुंगसाजी महाराज नर्सिंग कॉलेज आदींसह रासेयोचे पथक सहभागी होते.

महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.शंकर सावंत, प्रा.प्रियंका रुईकर, प्रा.अख्तरुन्निसा कुरेशी, डॉ.रामधन हिरे, प्रा.जुकरे, संतोष कोरडे, सुजाता पचगाडे, भारत शर्मा व महाविद्यालयातील विद्यार्थी रॅलीत सहभागी होते. त्यांनी जनजागृतीसाठी सहकार्य केले.

Hello Yavatmal
Page No. 3 Dec 17, 2018
Powered by: erelego.com

*AIDS Rally news published by ‘Lokmat’ newspaper*



सकाळ

दारव्हा : जागतिक एड्स सप्ताहानिमित्त येथील उपजिल्हा रुग्णालय व महाविद्यालयीन विद्यार्थी यांची निघालेली जनजागृती रॅली.

# जागतिक एड्स सप्ताहानिमित्त दारव्हा येथे जनजागृती रॅली

## उपजिल्हा रुग्णालयासह महाविद्यालयांचा सहभाग

**सकाळ वृत्तसेवा**

दारव्हा, ता. १७ : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय व उपजिल्हा रुग्णालय दारव्हा यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स सप्ताहानिमित्त गुरुवारी एड्स जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. विलास नवरंगे यांनी रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली.

येथील उपजिल्हा रुग्णालय येथून रॅलीला सुरुवात झाली. रॅलीच्या मार्गावर विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या घोषणा देत एड्सबाबत जनजागृती केली. रॅलीचा समारोप येथील शिवाजी स्टेडियमवर मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. रॅलीच्या समारोपप्रसंगी एड्स समुपदेशक प्रवीण नगराळे यांनी एड्स संदर्भात मार्गदर्शन करताना एड्सबाबत असणाऱ्या गैरसमजुती दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर वैद्यकीय अधीक्षक डॉ. आशिष कदम यांनी एड्स या आजाराची लागण होणार नाही, यासाठी आपण काय काळजी घ्यावी व आपली वर्तणूक कशी ठेवावी, याबाबत मार्गदर्शन केले. स्वयंसेवी संस्थेचे सदस्य अनिल त्रिवेदी यांनी सहभागी महाविद्यालयांचे आभार मानले. रॅलीमध्ये मुंगसाजी महाराज महाविद्यालय, जिजामाता महाविद्यालय, आयटीआय महाविद्यालय, मुंगसाजी महाराज नर्सिंग कॉलेज आदि महाविद्यालयाचे रासेयोचे पथक सहभागी होते. मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका ठाकूर, प्रा. अख्तरुन्निसा कुरेशी, जिजामाताचे डॉ. रामचंद्र हिरे, उपजिल्हा सामान्य रुग्णालयाचे संतोष कोरडे, सुजाता पचगाडे, भारत शर्मा यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Nagpur, Yavatmal-Today
18/12/2018 Page No. 5

*AIDS Rally news published by 'Sakal' newspaper*

**26/12/2018 'Alcohol de addiction Lecture'**



*Mr. Mahesh Pawar delivered speech on 'Alcohol de addiction'*



# मुंगसाजी महाराज महाविद्यालयात दारूमुक्तीवर व्याख्यान

**शहर प्रतिनिधी / २६ डिसेंबर**

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे २६ डिसेंबर २०१८ रोजी दारूमुक्तीवर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. सुभाष जाधव तर प्रमुख उपस्थिती मध्ये देवानंद राठोड, देवकुमार जाधव, प्रकाश गेडाम, प्रा. संदीप मुरले, डॉ. सौ. संगीता घुईखेडकर आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते महेश पवार यांनी दारूमुक्तीसाठी रासेयोच्या स्वयंसेवकांनी प्रयत्न करावा व झोपलेल्या समाजाला जागे करावे तसेच सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून समाजात निर्माण होणाऱ्या वाईट गोष्टी दूर कराव्या, असे आवाहन केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. सुभाष जाधव यांनी पाहुण्यांच्या भाषणाचा आढावा घेऊन कुटुंबातील एका व्यक्तीच्या दारू व्यसनाधीनतेमुळे कुटुंबाचा अनर्थ होतो म्हणून विद्यार्थ्यांनी आपले गाव दारूमुक्त करण्यासाठी प्रयत्न करावा असे आव्हान केले. संचालन सुबोध दहीलेकर व प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत तर आभार प्रदर्शन विक्रम गिरी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. प्रियंका खईकर प्रा. कु. अख्तर रुबिना कुरेशी व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. संदीप मुरले तसेच रासेयोच्या सर्व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले.

ePaper देशोन्नती Thu, 27 December 2018
deshonnati.digitaledition.in/c/35217060

*News published by ‘Daily Deshonnati’ newspaper of ‘Alcohol de addiction’*

## 1/1/2019 ‘Save Girl Teach Girl Rally’



*‘Save Girl Teach Girl Awareness Rally’*



*Save Girl Teach Girl Awareness Rally*



# रा.से.यो. च्या वतीने बेटी बचाव बेटी पढाव रॅली

शहर प्रतिनिधी / १ जानेवारी

दारव्हा : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, तनिष्का ग्रुप, दारव्हा व डॉक्टर्स असोसिएशन, दारव्हा यांचे संयुक्त विद्यमाने १ जानेवारी २०१९ रोजी बेटी बचाव बेटी पढाव महारॅलीचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी रॅलीची सुरुवात शिवाजी स्टेडियम पासून गोळीबार चौक, बस स्टँड, गोळीबार चौक, माळी बाजार, बारीपुरा, बाराभाई मोहल्ला, पुसद मोहल्ला, कारंजा नाका, पोस्ट ऑफिसमार्गे रॅली काढून रॅलीचा समारोप शिवाजी स्टेडियमवर करण्यात आला. रॅलीदरम्यान महाविद्यालयीन व विद्यालय मुलींनी वेगवेगळ्या घोषवाक्यद्वारे मुलींचे महत्त्व दारव्हा वासियांना पटवून दिले. समारोप प्रसंगी डॉ. पोटफोडे यांनी रॅलीत सहभागी विद्यार्थ्यांचे आभार मानले, तर प्रा. सुषमा गावंडे व डॉ. रामधन हिरे यांनी डॉक्टर्स असोसिएशनच्या कार्याचे कौतुक करून यापुढेही असोसिएशनद्वारा अशाच प्रकारचे उपक्रम राबवल्या जातील ही अपेक्षा व्यक्त केली. रॅलीमध्ये मुंगसाजी महाराज महाविद्यालय, जिजामाता महाविद्यालय, फातेमा उर्दू हायस्कूल, जि. प. उर्दू हायस्कूल व न.प. उर्दू हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. तसेच डॉ. पवन अग्रवाल, डॉ. नितीन भेंडे, डॉ. चावके, डॉ. मनोज राठोड, डॉ. आशिष पोटफोडे, डॉ. ऋचा पोटफोडे, डॉ. कोमल सांगानी डॉ. अश्विनी भेंडे, डॉ. कांचन नरवडे तसेच डॉ. सौ. संगीता घुईखेडकर, प्रा. सुषमा गावंडे, प्रा. मनीषा गावंडे प्रा. स्वाती शेंडे, प्रा. कु. प्रियंका सईकर, डॉ. नाझिया राशीदि, डॉ. शंकर सावंत, डॉ. मनिष मोहरील, आदींनी रॅलीमध्ये सहभाग घेतला.

Wed, 02 January 2019
deshonnati.digitaledition.in/c/35393780

*News published by 'Deshonnati' of 'Save Girl Teach Girl Awareness Rally'*

## 3/1/2019 ‘Savitribai Fule Birth Anniversary’




*Mr. S.V. Bhurale & Gawande worshiping Savitribai Fule Image*

## 7/1/2019 Visit to ‘Mushroom Plants Project’



*NSS Volunteers visited to the ‘Mushroom Plant Project’*

## 10/1/2019 ‘Educational Rally’




*Educational Rally*

## 12/1/2019 Swami Vivekanand & Jijau Birth Anniversary



*Dr. Ajay Dube worshiping Swami Vivekanand &Jijau Image*

## 23/1/2019 Subhash Chandra Bose Birth Anniversary



*Mr. K. V. Dhawale delivered speech on Subhash Chandra Bose Birth Anniversary*



लोकमत

# दारव्हा येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांना मानवंदना

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस पुतळा समितीतर्फे येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात घेण्यात आलेल्या कार्यक्रमात नेताजी सुभाषचंद्र बोस यांना मानवंदना देण्यात आली.

या कार्यक्रमाला विधानपरिषदेचे माजी उपसभापती माणिकराव ठाकरे, विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, उपविभागीय अधिकारी जयंत देशपांडे, तहसीलदार अरुण शेलार, ठाणेदार रिता उईके, प्राचार्य डॉ.विलास राऊत उपस्थित होते. त्यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या पुतळ्याला हारार्पण करण्यात आले. यावेळी माणिकराव ठाकरे, वसंतराव घुईखेडकर, जयंत देशपांडे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कार्याचा गौरव केला. महाविद्यालयातील पुतळा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. संचालन प्रा.खुशाल डवळे यांनी केले. कार्यक्रमाला काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रकाश नवरंगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रा.चरण पवार, अशोक काटकर, राजू ठाकरे, अजय व्यवहारे, सुभाष गावंडे, ग्रामसेवक संघटनेचे जिल्हा सरचिटणीस हिम्मतराव म्हातारमारे, पुरुषोत्तम राऊत, अर्जुन लढा, मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे बँडपथक उपस्थित होते. यशस्वीतेसाठी आयोजन समितीचे पवन काशीकर, श्याम कनोजिया, राम मात्रे, संजय सावळकर, आदर्श सावळकर व समितीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

Hello Yavatmal
Page No. 3 Jan 31, 2019
Powered by: erelego.com

*News published by 'Daily Lokmat' newspaper of Birth Anniversary Subhash Chandra Bose*

सकाळ

# दारव्हा येथे नेताजी सुभाषचंद्र बोस यांना मानवंदना

सकाळ वृत्तसेवा

[illegible]



दारव्हा: कार्यक्रमात विचार व्यक्त करताना माजीमंत्री माणिकराव ठाकरे व उपस्थित मान्यवर.

[illegible]

Nagpur Yavatmal Today
30/01/2019 Page No. 4

*News published by 'Daily Sakal' newspaper of Birth Anniversary Subhash Chandra Bose*

## 25/1/2019 'National Voter Day'




*Dr. Sunil Chawake delivered speech on 'National Voter Day'*




*Mr. Jayant Deshapande, SDO delivered speech on 'National Voter Day'*



*Mr. Arun Shelar, Thashildar delivered speech on 'National Voter Day'*

## 26/1/2019 'Republic Day'



*National Anthem on Republic Day*

## 30/1/2019 'Campus Cleanliness'



*Campus Cleanliness  by NSS Volunteers*

## 1/2/2019 ‘Leprosy Eradication Lecture’



*Mr. Ganesh Kumkar delivered speech on ‘Leprosy Eradication Lecture’*

सकाळ




दारव्हा : कुष्ठरोग निर्मूलन जनजागृती विषयावर व्याख्यान करताना मान्यवर.

# दारव्हा येथे कुष्ठरोग निर्मूलन जनजागृतीवर व्याख्यान

## महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त उपक्रम

दारव्हा, ता. ३ : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व उपजिल्हा सामान्य रुग्णालय यांच्या वतीने महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त कुष्ठरोग निर्मूलन जनजागृती व्याख्यान शुक्रवारी (ता. १) झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत होते.

यावेळी प्रमुख वक्ते म्हणून गणेश कुमकर, राजू दांडेकर, डॉ. सुनील चकवे, डॉ. संतोष चतुर, प्रा. संदीप भुरले, प्रा. पल्लवी तावडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी कुष्ठरोगाच्या संदर्भातील संदेश प्रिया देशपांडे हिने वाचून दाखविला. यावेळी उपजिल्हा रुग्णालयातील गणेश कुमकर यांनी कुष्ठरोगासंदर्भात माहिती देऊन कुष्ठरोग कशा प्रकारे होतो व त्यावर शासकीयस्तरावर कोणते औषध उपचार उपलब्ध आहेत, हे विद्यार्थ्यांना सांगितले. भविष्यात कुष्ठरोगासारख्या आजार लपवला जाऊ नये, म्हणून महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या रोगासंदर्भात जनजागृती करावी, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. सुनील चकवे महाविद्यालयाचे विद्यार्थी मतदान जनजागृती, कुष्ठरोग निर्मूलन जनजागृती आदींसारख्या कार्यात सहभाग होऊन सामाजिक बांधिलकी राखतात, असे स्पष्ट केले. डॉ. संतोष चतुर व डॉ. मनीष मोहरील यांनीही विचार व्यक्त केले. प्राचार्य डॉ. विलास राऊत यांनी कुष्ठरोग ही राष्ट्रीय आपत्ती आहे. ही आपत्ती दूर करण्याकरिता विद्यार्थ्यांनी योगदान द्यावे, असे आवाहन केले. यावेळी कुष्ठरोग शोधमोहिमेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन सुबोध दहिलेकर यांनी केले. प्रास्ताविक 'रासेयो'चे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी केले. प्रा. प्रियांका कईकर यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. मनीष मोहरील व 'रासेयो'च्या स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

Nagpur, Yavatmal-Today
04/02/2019 Page No. 4

*Leprosy Eradication Lecture news published by ‘Sakal’ newspaper*

## 23/2/2019 Gadge Baba Birth Anniversary



*Dr. S. M. Sawant delivered speech on occasion 'Gadge Baba Birth Anniversary'*



सकाळ

# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त दारव्हा येथे विविध कार्यक्रम

**दारव्हा, ता. २४ :** येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शनिवारी (ता.२३) संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धा व परिसर स्वच्छता आदी कार्यक्रम घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. सुभाष जाधव होते. प्रमुख पाहुणे म्हणून इंग्रजी विभागप्रमुख डॉ. अरविंद लाडोळे, प्रा. रवी बोरकर, प्रा. संदीप भुरले, प्रा. नितीन भिंगारे, प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. फरहाना शेख आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी पाहुण्यांनी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण केला. डॉ. अरविंद लाडोळे यांनी संत गाडगे महाराज यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. संत गाडगे बाबांच्या विचारांचा आपण सर्वांनी अवलंब केल्यास आपण सर्वजण वसुधैव कुटुम्बकम ही संकल्पना पूर्णत्वास नेऊ व सर्वजण गुण्यागोविंदाने आपले जीवन जगू. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी त्यांच्या विचारांचा स्वीकार करून त्याला आचरणात आणावे, असे आवाहन लाडोळे यांनी केले. डॉ. सुभाष जाधव यांनी संत गाडगे बाबांच्या कार्याचे अनुकरण करून नवसमाज व नवराष्ट्राची निर्मिती करावी, असे आवाहन केले. संचालन प्रा. प्रियंका रुईकर यांनी केले. प्रास्ताविक डॉ. शंकर सावंत यांनी केले. प्रा. संदीप भुरले यांनी आभार मानले.

दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालयात संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त विचार व्यक्त करताना प्रा. डॉ. अरविंद लाडोळे व उपस्थित मान्यवर.

Nagpur, Yavatmal-Today

*Gadge Baba Birth Anniversary news published by 'Sakal' newspaper*



मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

Thu, 28 February 2019

https://deshonnati.digitaleditio



लोकमत

शाळा-महाविद्यालयांतून

मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा

Hello Yavatmal
Page No. 3 Mar 12, 2019
Powered by: erelego.com

*Gadge Baba Birth Anniversary news published by 'Deshonnati' and 'Lokmat' Newspapers*

## 20/2/2019 Skill Sathi ( Employment opportunities)



*Resource person guiding on different employment opportunities*

# 5/3/2019 'Blood Donation Camp'



*Inauguration Blood Donation Camp by the guests*



*NSS volunteer donating blood in 'Blood Donation Camp'*



मंगळवार दि. ५ मार्च २०१९
epaper.-deshonnati.com

थोडक्यात

## आज दारव्हा येथे भव्य रक्तदान शिबिर

दारव्हा : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय यांचे राष्ट्रीय सेवा योजना विभाग द्वारे आज ५ मार्च २०१९ रोजी पुलवामा शहिदांना श्रद्धांजली व वसंतराव घुईखेडकर यांच्या वाढदिवसा निमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जखमी जवानांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे यासाठी बचत भवन दारव्हा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. त्यामुळे जनतेने या रक्तदान शिबिरामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत तसेच रासेयोचे कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत यांनी केले आहे.

ePaper देशोन्नती Tue, 05 Mar
https://desl



## दारव्हा येथे आज रक्तदान शिबिर

दारव्हा : 'दान करा रक्ताचे-सार्थक होईल जीवनाचे, दोन थेंब रक्ताचे-जीवन देईल मोलाचे', या विचारधारेवर आधारित येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे पुलवामा शहिदांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सोबतच वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त येथील बचत भवनात मंगळवारी (ता. ५) रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. गेल्या फेब्रुवारीत पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात आपले जवान शहीद झालेत. त्यांनी आपले रक्त सांडून देशाचे रक्षण केले. या जवानांना व देशाच्या रक्षणकर्त्यांना अभिवादन करण्यासाठी, सोबत राष्ट्रीय कार्यात सहभागी होण्यासाठी आपण आपले थोडेसे रक्तदान करू या. राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने पुलवामा शहिदांना श्रद्धांजली व विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (ता. ५) सकाळी दहा ते दोन या वेळेत येथील बचत भवनात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी शासकीय जिल्हा रुग्णालयाचे विशेष सहकार्य लाभणार आहे. रक्तदान हे महादान असून, या पुण्यकार्यात नागरिकांनी सहभागी व्हावे व रक्तदान करावे, असे आवाहन मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने करण्यात आले आहे.

*Blood Donation Camp news published by 'Sakal and Deshonnati' newspapers*

**लोकमत**



शिबिरात रक्तदान करताना विद्यार्थी व उपस्थित घुईखेडकर, शेळके आदी.

# दारव्ह्यात १०४ जणांचे रक्तदान

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी आयोजित रक्तदान शिबिरात १०४ दात्यांनी रक्तदान केले.

शिबिराला विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंतराव घुईखेडकर, उत्तमराव शेळके, सुभाष ठोकळ प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांनी फीत कापून शिबिराचे उद्घाटन केले. संत गाडगेबाबा, अमर जवान ज्योती, माजी आमदार बाळासाहेब घुईखेडकर यांना हारार्पण करून रक्तदान शिबिराची सुरुवात झाली. शिबिरामध्ये १०४ दात्यांनी रक्तदान करून शहीद जवानांना श्रद्धांजली वाहिली.

शहरातील विविध सामाजिक संघटनांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिराला स्व.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळच्या रक्तपेढी विभागाचे डॉ.सुमित डांगे, गणेश कानडे, प्रदीप वाघमारे, सुशील ताकतांडे, भाऊ धारशिंवे, भाऊ ठाकरे, भाऊ जाधव यांनी सहकार्य केले. यशस्वीतेसाठी विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ.संगीता घुईखेडकर, मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विलास राऊत यांच्या मार्गदर्शनात डॉ.शंकर सावंत, डॉ.अरविंद लाडोळे, डॉ.सुनील चकवे, डॉ.सुभाष जाधव, प्रा.संदीप भुरले, प्रा.प्रियंका रुईकर, प्रा.अख्तरउन्नीसा कुरेशी, डॉ.मनीष मोहरील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी सहकार्य केले. शिबिरात महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

*Blood Donation Camp news published by 'Lokmat' newspaper*



दारव्हा : येथील बचत भवन येथे रक्तदान शिबिरात रक्तदान करताना रक्तदाता व उपस्थित मान्यवर.

# दारव्हा येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयात रक्तदान शिबिर

दारव्हा : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे पुलवामा येथील भ्याड हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली, सोबतच विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त मंगळवारी (ता. ५) रक्तदान शिबिर घेण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष उत्तम शेळके, माजी सभापती सुभाष ठोकळ व वसंत घुईखेडकर यांच्या हस्ते करण्यात आले. रक्तदान शिबिरामध्ये वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांच्या रक्तपेढी विभागाद्वारे सुमित डांगे, गणेश कानडे, प्रदीप वाघमारे, सुशील ताकतांडे, धारशिवे, ठाकरे, जाधव आदींच्या चमूने सहकार्य केले. या रक्तदान शिबिरामध्ये १०४ रक्तदात्यांनी रक्तदान करून देशाच्या सीमेवर तैनात सैनिकांच्या कार्याला, शहीद जवानांना रक्तदानाच्या माध्यमातून मानवंदना दिली. या रक्तदान शिबिरामध्ये शहरातील विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. शिबिरासाठी मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास राऊत यांच्या मार्गदर्शन डॉ. शंकर सावंत, डॉ. अरविंद लाडोळे, डॉ. सुनील चकवे, डॉ. सुभाष जाधव, प्रा. संदीप भुरले, प्रा. प्रियंका रुईकर, प्रा. अख्तर रूणिसा कुरेशी, डॉ. मनीष मोहरील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

*Blood Donation Camp news published by 'Sakal newspaper*

# दारव्हा येथे रक्तदान शिबिर



***शहर प्रतिनिधी* / ५ मार्च**

**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालय दारव्हा येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे सीआरपीएफच्या शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी व विद्या प्रसारक मंडळ दारव्हाचे अध्यक्ष वसंत घुईखेडकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ५ मार्च रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. याप्रसंगी उत्तमराव शेळके व वसंत घुईखेडकर यांनी फीत कापून शिबिराचे उद्घाटन केले. रक्तदान शिबिरामध्ये वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळ यांच्या रक्त पेढी विभागाद्वारे डॉ. सुमित डांगे, गणेश कानडे, प्रदीप वाघमारे, सुशील ताकतांडे, धारशिंबे, ठाकरे, जाधव या चमूने सहकार्य केले. शिबिरा दरम्यान १०४ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

ePaper देशोन्नती Wed, 06 March 2019
https://deshonnati.digitaledition.:

*Blood Donation Camp news published by 'Deshonnati' newspaper*

## NSS Special Camp at ‘Adopted Village’ Deulgaon Walsa 15/12/18 to 22/12/18

## NSS Special Camp Inauguration at ‘Adopted Village’ Deulgaon Walsa




*NSS Special Camp Inauguration by Mr. Kishor Rathod*



# मुं.म.महाविद्यालयाच्या रासेयो विशेष शिबिराचे आयोजन

**शहर प्रतिनिधी** / १३ डिसेंबर

**दारव्हा** : स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे रासेयो विशेष शिबिर तालुक्यातील दत्तक ग्राम देऊळगाव वळसा येथे १५ ते २२ डिसेम्बर २०१८ या दरम्यान सम्पन्न होणार आहे. या विशेष शिबिरा दरम्यान सात दिवस अनेक समाज, लोक व विद्यार्थी उपयोगी कार्यक्रम घेण्यात येणार आहे. १६ डिसेम्बर रोजी शिबिराचे उदघाटन डॉ. निलेश पांडे उपविभागीय पोलिस अधिकारी, अरुण शेलार तहसीलदार, दारव्हा यांचे हस्ते व प्रा. कमल राठोड रासेयो जिल्हा समन्वयक, प्राचार्य डॉ. विलास राऊत, डॉ. सौ. संगीताताई घुइखेडकर सचिव विद्या प्रसारक मंडळ दारव्हा आदींच्या प्रमूख उपस्थितीत होणार आहे.

या शिबिराचा समारोप २२ डिसेम्बर ला रिता ऊइके ठाणेदार पोलीस स्टेशन दारव्हा व आर. के. दोडके गट विकास अधिकारी पं. स. दारव्हा यांचे उपस्थितीत होणार आहे. या शिबिराचा परिसरातील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य डॉ. विलास राऊत, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, रासेयो सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. प्रियंका रुईकर, प्रा.कु. अख्तरुन्नीसा कुरेशी यांनी केले.

Fri, 14 December 2018
deshonnati.digitaledition.in/c/34853968

*NSS Special Camp Inauguration news published by ‘Deshonnati’ newspaper*

सकाळ

# देऊळगाव येथे रासेयोचे शिबिर

## मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचा उपक्रम

सकाळ वृत्तसेवा

दारव्हा, ता. १४ : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे रासेयोचे विशेष शिबिर तालुक्यातील दत्तक ग्राम देऊळगाव वळसा येथे ता. १५ ते २२ डिसेंबर या दरम्यान होणार आहे. या विशेष शिबिरादरम्यान सात दिवस अनेक समाजोपयोगी, कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

रविवारी (ता. १६) डिसेंबरला शिबिराचे उद्‌घाटन उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. नीलेश पांडे, तहसीलदार अरुण शेलार यांच्या हस्ते व रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. कमल राठोड, प्राचार्य डॉ. किसन वळज, विद्या प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. संगीता घुईखेडकर आदींच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागात राहून ग्रामीण भागाच्या अडचणी व प्रश्न जाणून घेण्यात येणार असून त्यावरील उपाय शोधून त्यावर कार्य करण्यास युवा पिढीला प्रोत्साहित करण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. या व सोबतच अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसनमुक्ती, लेक वाचवा अभियान जनजागृती, ग्राम स्वच्छता, श्रमदान, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच आरोग्य तपासणी व जनावरांचे मोफत लसीकरण करण्यात येणार आहे. डॉ. श्रीकांत झलके, डॉ. गोविंद चव्हाण, डॉ. सुकते, डॉ. शेख व त्या-त्या विभागाची चमू मदत करणार आहे. या शिबिराचा समारोप शनिवारी (ता. २२) ठाणेदार रिता उईके, सांख्यिकी अधिकारी आर. के. दोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. शिबिराचा परिसरातील ग्रामस्थ व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. किसन वळज, रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. शंकर सावंत, रासेयो सहायक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील, रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका रहेकर, प्रा. अब्दुलसलीम कुरेशी यांनी केले आहे.

### विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन

शिबिरांमध्ये ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या बौद्धिक सत्रात व्यक्तिमत्त्व विकास, महात्म्य तंत्र प्रशिक्षण, रासेयो म्हणजे नेतृत्व गुणांचा विकास, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, ग्राहक संरक्षण कायदा, आदी विषयांवर डॉ. संजय भोयर, नम्रता राजस, डॉ. निवृत्ती पिस्तूलकर, डॉ. प्रदीप येवले, अॅड. वैशाली हिंगे आदी मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

Nagpur Yavatmal-Today
15/12/2018 Page No. 3

*NSS Special Camp Inauguration news published by 'Sakal' newspaper*

# मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे विशेष शिबिर

**शहर प्रतिनिधी / १८ डिसेंबर**




**दारव्हा :** स्थानिक मुंगसाजी महाराज महाविद्यालयाचे सत्र २०१८-१९ मधील रासेयोच्या विशेष शिबिराचे उदघाटन डॉ. कमल राठोड व प्रा. किशोर राठोड यांच्या शुभहस्ते १६ डिसेंबर ला पार पडले. डॉ. राठोड रासेयो जिल्हा समन्वयक प्रा. किशोर राठोड सौ. शालु गुघाने, उपसरपंच, वळसा धर्मदास राऊत, सचिव, महालक्ष्मी संस्थान वळसा, शंकर राव राऊत, महालक्ष्मी संस्थान वळसा, डॉ. संतोष चतुर, प्रा. संदीप मुरले, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. कु. प्रियंका रहेकर, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ. मनीष मोहरील, सुनील अगमे आदी मान्यवर उपस्थित होते उपस्थत मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले, अध्यक्षीय भाषणामध्ये आपले विचार व्यक्त करताना कला शाखा प्रमुख डॉ. सुनील चक्वे यांनी महाविद्यालयातील रासेयो म्हणजे शरीरातील हृदय आहे. ज्याप्रमाणे हृदय बंद पडली की, माणूस मृत पावतो त्याप्रमाणे महाविद्यालयातील रासेयो बंद पडल्यास महाविद्यालयाचा जिवंतपणा नष्ट होईल. महाविद्यालयाला जिवंत ठेवण्याचे काम रासेयो करते तसेच विद्यार्थ्यांनी आपली महाविद्यालयाची व महाविद्यालयाचा प्राध्यापक वर्ग यांची प्रतिष्ठा उंचावण्याकरिता वळसा गावापुढे रासेयो स्वयंसेवकांचा आदर्श निर्माण करावा असे आव्हान केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास पाईकराव याने तर प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय कार्यक्रम अधिकारी यांनी केला.

ई-पेपर देशोन्नती
Wed, 19 December 2018
deshonnati.digitaledition.in/c/34991879

*NSS Special Camp Inauguration news published by 'Deshonnati' newspaper*

# 17/12/2018 Intellectual Session on ‘Personality Development’




*Dr. Sanjay Bhoyar delivered speech on ‘Personality Development’*



सकाळ

# शिबिरातून बौद्धिक क्षमतेचा विकास

## डॉ. संजय भोयर : देऊळगाव वळसा येथे रासेयो शिबिराचे उद्घाटन

दारव्हा, ता. १८ : सात दिवस चालणाऱ्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामधून आपल्यातील चांगल्या गुणांना विकसित करण्याची संधी मिळते. यातूनच आपल्या बौद्धिक व शारीरिक क्षमतेचा विकासाला चालना लागते. त्यामुळेच रासेयोचे हे फक्त शिबिर नसून व्यक्तीमत्व विकास शिबिर असल्याचे मत डॉ.. संजय भोयर यांनी येथे व्यक्त केले.

येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे आयोजित दत्तक ग्राम देऊळगाव वळसा येथे १७ डिसेंबरला रासेयो शिबिरामध्ये प्रमुख वक्ते म्हणून डॉ.. भोयर बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.. शंकर सावंत तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. किशोर राठोड, प्रा. चापूर, प्रा. प्रियंका राईकर, डॉ.. मनिष मोहोड, प्रा. अख्तरुन्नीसा कुरेशी उपस्थित होते. पुढे बोलताना भोयर की, म्हणाले व्यक्तिमत्व विकास म्हणजे झटपट होणारी गोष्ट नसून ती दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. आळस हा व्यक्तिमत्त्व विकासातील सर्वात मोठा अडथळा आहे. त्यामुळे आळस झटकून विद्यार्थ्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून स्वतःला सर्वगुणसंपन्न नागरिक म्हणून सिद्ध करावे. रासेयो शिबिरातून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाची उंची वाढविण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन याप्रसंगी डॉ.. शंकर सावंत यांनी यावेळी केले. संचालन रासेयो स्वयंसेवक प्रकाश इंगळे, प्रास्ताविक महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रियंका राईकर यांनी तर आभार रासेयो स्वयंसेविका योगिता तांदूळकर हिने मानले. कार्यक्रमासाठी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी डॉ.. मनिष मोहोड, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. अख्तरुन्निसा कुरेशी, सुनील अगमे व रासेयोच्या स्वयंसेवकांनी पुढाकार घेतला.

दारव्हा : रासेयो शिबिराचे उद्घाटन करताना मान्यवर.

Nagpur, Yavatmal-Today
19/12/2018 Page No. 4

*Personality Development news published by ‘Sakal’ newspaper*

## 18/12/2018 Intellectual Session on Mushroom Production Techniques & Goat Breeding Training



*Namrata Rajas demonstration on 'Mushroom Production Techniques'*



*Dr. Devanand Raut delivered speech on 'Goat Breeding Training'*

## लोकमत

# देऊळगाव येथे मशरुम तंत्र प्रशिक्षण शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

दारव्हा : येथील मुंगसाजी महाराज महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे देऊळगाव येथे विशेष शिबिरात बौद्धिक सत्राच्या माध्यमातून मशरुम तंत्र प्रशिक्षण व शेळी पालन विषयावर शिबिर घेण्यात आले.

